# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.02.2026** **वारःमंगळवार**

---

1. भारतीय उत्पादनांवरच्या आयात शुल्कात अमेरीकेनं घट केल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा
2. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर
3. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात.
4. यंदाच्या रेल्वेच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी 23 हजार 926 कोटी रुपयांची विक्रमी तरतूद. आणि
5. यंदाच्या रबी हंगामात पेरणी क्षेत्रात उल्लेखनीय वाढ

**<u>भारत-अमेरिका-व्यापार</u>**

भारतात उत्पादित झालेल्या म्हणजेच मेड इन इंडिया उत्पादनांवरील आयात शुल्कात अमेरिकेनं घट केली असून ते आता 25 टक्क्याऐवजी 18 टक्के होणार असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या समाज माध्यमांवरील संदेशात दिली आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनल्ड ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर पंतप्रधानांनी ही घोषणा केली आहे. प्रिय मित्र ट्रम्प यांच्याशी संवाद साधणे सुखद बाब असल्याचं सांगत दोन मोठ्या अर्थव्यवस्था आणि दोन लोकशाही देश जेव्हा एकत्रित काम करतात तेव्हा त्याचा फायदा सामान्य नागरिकांना होतो शिवाय परस्पर हिताच्या सहकार्याच्या अमाप संधीही उपलब्ध होतात, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. मोदींनी भारतीय जनतेच्या वतीने ट्रम्प यांचे आभारही मानले आहेत. जागतिक शांतता, स्थैर्य आणि विकासासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे नेतृत्व अत्यंत महत्त्वाचं असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

ट्रम्प यांच्या शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना भारताचा पूर्ण पाठिंबा असल्याचंही मोदी यांनी म्हटलं आहे. द्विपक्षीय भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी ट्रम्प यांच्यासमवेत काम करण्यात उत्सुक असल्याचंही मोदी यांनी नमूद केलं आहे.

**<u>ट्रम्प</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनीही याबाबत समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला आहे. भारतीय उत्पादनांवरील अमेरिकन आयात शुल्क 25 टक्क्यांवरून 18 टक्क्यांपर्यंत कमी करण्यात येणार असल्याचं ट्रम्प यांनी या संदेशात म्हटलं आहे. या संदर्भातल्या व्यापार करारावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली असून, भविष्यात दोन्ही देशांचे संबंध भविष्यात अधिक बळकट होतील, असं ट्रम्प यांनी संदेशात नमूद केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांचे उत्तम मित्र असून भारताचे बलशाली आणि आदरणीय नेते असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**<u>व्याक-जयशंकर, शहा, राजनाथ</u>**

भारत आणि अमेरिकेतील प्रस्तावित व्यापार करार आणि अमेरिकेनं आयात शुल्कात कपात केल्याबद्दल विविध केंद्रीय मंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं आहे.

यामुळे दोन्ही देशांमध्ये रोजगार निर्माण होऊन विकास आणि नवोपक्रमांना चालना मिळेल असं  परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या करारामुळे दोन्ही देशांची धोरणात्मक भागीदारी बळकट होणार असून, दोन्ही देशांतील नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ होणार असल्याचं नमूद केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही भारत अमेरिका द्वीपक्षीय संबंधांच्या दृष्टीने हा मोठा दिवस असल्याचं नमूद केलं आहे.

तर वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनीही करारासंदर्भात दोन्ही राष्ट्रप्रमुख आणि जनतेचे अभिनंदन केले असून, हा व्यापार करार, दोन लोकशाही राष्ट्रांनी सामाईक विकासासाठी एकत्र काम करण्याची ताकद दर्शवत असल्याचं म्हटलं आहे.

**भाराक्वात्रा-अरागोर**

या प्रस्तावित करारामुळे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प उत्साहित असल्याचं अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिओ गोर यांनीही गोर यांनी समाज माध्यमांवरील आपल्या संदेशात नमूद केलं आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्त्वांतर्गत होणारा हा व्यापार करार परस्पर भागीदारातील मोठा विजय असल्याचं अमेरिकेतील भारतीय राजदूत विनय क्वात्रा यांनी म्हटलं आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर कालपासून अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रूबियो यांनी बोलावलेल्या खनिज क्षेत्राशी संबंधित मंत्रिस्तरीय बैठकीत जयशंकर सहभागी होणार आहेत. महत्त्वपूर्ण खनिजांच्या क्षेत्रातील धोरणात्मक भागीदारी, पुरवठा साखळी मजबूत करणं आणि स्वच्छ ऊर्जा या मुद्द्यावर या बैठकीत भर दिला जाईल असं परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

आपल्या तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यात डॉ. जयशंकर अमेरिकेतल्या वरिष्ठ प्रशासकीय  अधिकाऱ्यांशीही चर्चा करणार आहेत.

**लोकसभा**

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला काल सुरूवात झाली. लोकसभेत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. देशाच्या भविष्याविषयी अतिशय प्रभावी दृष्टीकोन राष्ट्रपतींनी या भाषणात व्यक्त केला. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि विकसित भारताचं सरकारचं उद्दिष्ट यात प्रतिबिंबित होत असल्याचं सोनोवाल म्हणाले. या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी माजी लष्कर प्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकाशी संबंधित वक्तव्य केलं, यावर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज आधी 3 वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राहुल गांधी जनतेची दिशाभूल करत आहेत असा आरोप संरक्षण मंत्री  राजनाथ सिंह यांनी केला. राज्यसभेतही काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरू झाली.  नामनिर्देशित सदस्य सी सदानंद मास्टर यांनी हा धन्यवाद प्रस्ताव मांडला; त्याला खासदार मेधा कुलकर्णी यांनी अनुमोदन दिलं.

**राष्ट्रपती मुर्मू**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू काल संध्याकाळी ओडिशाच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर भुवनेश्वरमध्ये दाखल झाल्या. या दौऱ्यात,राष्ट्रपती विविध शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. आज राष्ट्रपती मुर्मू जाजपूर इथल्या माँ बिरजा मंदिरात पूजा-अर्चा करतील आणि त्यानंतर त्या बालासोर इथल्या फकीर मोहन विद्यापीठाच्या 12 व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. तर संध्याकाळी, राष्ट्रपती मुर्मू श्री जगन्नाथ मंदिराच्या दर्शनासाठी पुरीकडे रवाना होतील.

**अश्विनी वैष्णव**

2026-27च्या रेल्वेच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी 23 हजार 926 कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिली. मुंबईत मध्य रेल्वेच्या मुख्यालयात झालेल्या वार्ताहर परिषदेला त्यांनी दूरस्थ पद्धतीने संबोधित केलं. राज्यात मुंबई ते पुणे आणि पुणे ते हैदराबाद या दोन बुलेट ट्रेन्सनाही या अर्थसंकल्पात मान्यता देण्यात आली असून हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या तिन्ही शहरांना खूप फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अर्थसंकल्पात मान्यता मिळालेला नवा मालवाहतूक कॉरिडॉर राज्यातल्या वाढवण बंदरालाही जोडण्याची योजना असून यामुळे देशभरात मालवाहतुकीचं जाळं तयार होईल, असं ते म्हणाले. राज्यात एकंदर 1 लाख 70 हजार कोटी रुपयांचे रेल्वेचे प्रकल्प सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचं कामवेगाने सुरू असून पुढच्या वर्षी ही ट्रेन सुरू होईल, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

**निवडणूक आयोग**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेबाबत केलेले आरोप, निवडणूक आयोगानं फेटाळून लावले आहेत. हे आरोप निराधार असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. यापूर्वी,ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसच्या शिष्टमंडळानं निवडणूक आयोगाची भेट घेऊन पश्चिम बंगालमधल्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेशी संबंधित काही मुद्दे उपस्थित केले होते. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि दोन्ही निवडणूक आयुक्तांनी शांतपणे ऐकून घेतल्यानंतरही, ममता बॅनर्जी यांनी खोटे आरोप केल्याचं सूत्रांनी सांगितलं.
दरम्यान,भाजपनं पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नवी दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्तांसोबत झालेल्या भेटीवर टीका केली आहे.

**रबी पीके**

देशात यंदाच्या रबी हंगामात पेरणी क्षेत्रात उल्लेखनीय वाढ झाली आहे. गेल्या महिन्याच्या तीस तारखेपर्यंत 6शे 76 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी झाल्याचं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे. यंदाच्या हंगामात रबी पेरणीच्या क्षेत्रात वाढ झाल्याचं नमूद करताना, गेल्या वर्षीच्या तुलनेत ही वाढ 15 लाख हेक्टर इतकी असल्याचं म्हटलं आहे. एकंदर 335 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर गहू तर 45 लाख हेक्टर क्षेत्रावर भाताची पेरणी करण्यात आली आहे.
डाळींच्या पेरणी क्षेत्रातही वाढ झाली असून 139 लाख हेक्टरवर डाळींच्या बियाणाची पेरणी झाली आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागानं प्रसिद्ध केलेल्या अहवालात भरड धान्यांची पेरणी 61 लाख हेक्टरवर झाल्याचं नमूद केलं आहे तर 97 लाख हेक्टर क्षेत्रावर तेलबियांची लागवड करण्यात आल्याचं म्हटलं आहे.

**महिला क्रिकेट**

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये,आज वडोदरामधील कोटांबीतल्या बीसीए मैदानावर गुजरात जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता होईल. या सामन्यातील विजेत्या संघाची येत्या गुरुवारी अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुशी लढत होईल. स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखालील आरसीबी महिला संघानं लीग टप्प्यात अव्वल स्थान पटकावून अंतिम सामन्यातलं आपलं स्थान आधीच निश्चित केलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.